एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत ग्रामीण व आदिवासी प्रकल्पातील अंगणवाडी केंद्रांना संदेश प्रबोधन पुस्तिका/चार्टचा पुरवठा करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

महिला व बाल विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक :- एबावि-२०१५ /प्र.क्र.२२/का-५

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**दिनांक :- १३ फेब्रुवारी, २०१५**

**वाचा** :- १) आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांचे पत्र क्र.मबावि/एबाविसेयो/का-२/९७०/२०१४, दि.२५/०८/२०१४

२) उद्योग संचालनालय, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई (CSPO) यांचे परिपत्रक क्र.भांखसं/ हातकागद/दरनिश्चिती/(४०)/२०१२-१३/बी-१४१५४, दि.२७/०९/२०१२

३) उद्योग संचालनालय, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई (CSPO) यांचे परिपत्रक क्र.भांखसं/हातकागद/दरनिश्चिती/(१६)/२०१४-१५/ऐ-१०१७, दि.१२/०८/२०१४

**शासन निर्णय** :- उद्योग संचालनालय, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई (CSPO) यांनी केलेल्या दरनिश्चितीवर मे.महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई / हातकागद संस्था, पुणे यांचेकडून **हँडमेड पेपरवर दृक संदेश प्रबोधन पुस्तिका/चार्ट** तपशिल : १० पानी चार्ट, स्टॅन्ड व स्पायरल बाईंडिंगसह (१० पानाच्या पुढील प्रत्येक पानास १३/- रुपये जास्त आकारले जातील), **आकार :** ८" X ११" **कागद :** २१० जी.एस.एम. याप्रमाणे ग्रामीण व आदिवासी प्रकल्पातील ७२७७२ अंगणवाडी केंद्रांना प्रति अंगणवाडी केंद्र ३ नग याप्रमाणे एकूण २१८३१६ दृक संदेश प्रबोधन पुस्तिका/चार्ट रू.१३७.२०/- प्रति नग या दराने **८ पैसे** अंतर्गत उपलब्ध असलेल्या तरतूदीतून पुरवठा करण्यास व त्यासाठी येणाऱ्या **रु.२,९९,५२,९५५**/- (अक्षरी रुपये दोन कोटी नव्याण्णव लाख बावण्ण हजार नऊशे पंचावन्न फक्त) इतक्या खर्चास या शासन निर्णयान्वये खालील अटीच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

१) दृक संदेश प्रबोधन पुस्तिका/चार्ट ची मागणी व पुरवठा CSPO ने दरनिश्चितीच्या परिपत्रकात / दरकरार पत्रकात स्पष्ट केल्याप्रमाणे केला जाईल. तसेच दि.२७/०९/२०१२ च्या दरनिश्चितीच्या परिपत्रकास / दरकरार पत्रकास मुदतवाढ देण्याबाबतच्या दि.१२/०८/२०१४ रोजीच्या पत्रातील कागदाचा प्रकार व विनिर्देश व अटींची पूर्तता काटेकोरपणे केली जाईल, याची दक्षता आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी घ्यावी.

२) सदरचा निधी शासनाच्या विहीत धोरणानुसार व कार्यपध्दतीनुसार खर्च करण्यात येईल.

३) पुरवठादाराने वरील प्रमाणे दृक संदेश प्रबोधन पुस्तिका/चार्टचा पुरवठा ग्रामीण व आदिवासी प्रकल्पस्तरापर्यंत करावा. प्रकल्प स्तरावर साहित्य प्राप्त झाल्यानंतर ते संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी त्याच दिवशी पंचनामा करुन स्विकारावे व दुसऱ्या दिवशी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.) यांना कळवावे. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत साहित्य पुरवठा करण्यासंदर्भात शासन पत्र क्र.विपताप्र-२०११/प्र.क्र.५३३/का-६, दि.१७/७/२०१२ मधील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

४) एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत ग्रामीण व आदिवासी प्रकल्पातील अंगणवाडी केंद्रात येणाऱ्या किशोरवयीन मुलीना आहार, आरोग्य, वैयक्तिक स्वच्छता व शिक्षणाचे महत्व या विषयाची माहिती देण्यास उपयुक्त असलेल्या दृक संदेश प्रबोधन पुस्तिका/चार्ट चा उपलब्ध तरतूदीतून विहित पध्दतीचा अवलंब करून पुरवठा करण्यात यावा.

५) पुरवठादाराने मागणी प्रमाणे विहीत प्रमाणात, विहीत केलेल्या गुणवत्तेनुसार किशोरवयीन मुलींना आहार, आरोग्य, वैयक्तिक स्वच्छता व शिक्षणाचे महत्व या विषयाची माहिती देण्यास उपयुक्त असलेल्या दृक संदेश प्रबोधन पुस्तिका/चार्ट चा प्रकल्प स्तरापर्यंत पुरवठा केला आहे, याबाबतची खात्री करण्यात यावी.

६) एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत ग्रामीण व आदिवासी प्रकल्पातील अंगणवाडी केंद्रात येणाऱ्या किशोरवयीन मुलींना आहार, आरोग्य, वैयक्तिक स्वच्छता व शिक्षणाचे महत्व या विषयाची माहिती देण्यास उपयुक्त असलेल्या दृक संदेश प्रबोधन चार्ट वर महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन असे छापण्यात यावे. सदर दृक संदेश प्रबोधन पुस्तिका/चार्ट चा पुरवठा व खर्च यामध्ये अनियमितता झाल्यास व लेखा आक्षेप उद्भवल्यास त्याची जबाबदारी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांची राहील.

७) हया योजनेचा लाभ लाभार्थ्यांना पोहचावा, या दृष्टीने स्वयंस्पष्ट माहिती, अंगणवाडयात नोंदवहीमध्ये घेण्याबाबत उचित मार्गदर्शक सूचना आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई हयांनी दयाव्यात.

८) सदर आदेशानुसार प्रत्यक्षात पुरवठा झालेला आहे, याची खात्री झाल्यावरच देयक अदा करण्यात यावे. यासाठी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई हे जबाबदार राहतील.

२. यासाठी होणारा खर्च " **ग्रामीण / आदिवासी प्रकल्पांसाठी :- योजनेत्तर** :- मागणी क्र.एक्स-१,मुख्यलेखाशिर्ष २२३६-पोषण आहार, ०२, पोषक अन्न व पेये यांचे वितरण,१०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, (०३) जिल्हा परिषदांना अनुदान (०३) (०१) एकात्मिक बाल विकास सेवा योजना (मानधन व आहार खर्च) (२२३६००२७) १९ आहार खर्च, **योजनांतर्गत** :- मागणी क्र.एक्स-१,मुख्यलेखाशिर्ष २२३६-पोषण आहार, ०२, पोषक अन्न व पेये यांचे वितरण, १०१, विशेष पोषण आहार कार्यक्रम, राज्य योजनांतर्गत योजना (ग्रामीण १०० टक्के) (०५) एकात्मिक बाल विकास सेवा योजना(०५)(०२)एकात्मिक बाल विकास सेवा योजना (२२३६००६३)१९ आहार खर्च " या लेखशिर्षांखालील सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा व तो त्याच लेखाशिर्षांखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. याकरीता आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांना आहरण, संवितरण व नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय वित्त विभाग, परिपत्रक क्र.अंदाज-२०१३/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३, दि.०९/०२/२०१५ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सी.श.डोके)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा, (आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचेमार्फत)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी(बा.क.), जिल्हा परिषदा,(आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचेमार्फत)
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई / नागपूर.
मे.महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई / हातकागद संस्था, पुणे
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी,
सहाय्यक संचालक (वित्त व लेखा), एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई
कक्ष अधिकारी (का-४), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती (कार्यासन-५)